माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / २८१ / २०२५ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गणेश लक्ष्मणराव आवटे	दुय्यम निबंधक वर्ग-२, सह दुय्यम निबंधक वर्ग -२ हवेली क्र.१ यांचे कार्यालय, पुणे.	सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर पुणे.

(सुनावणी दिनांक - १७ / ०३ / २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १५.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
३०.०९.२०२५	दि. २८.०६.१९९० चे खरेदी खत भालचंद्र राजाराम रेणुसे यांच्या पासून जुना- १७३७० नवा- ८६०३ या क्रमांकाच्या नोंदीने सह दुय्यम निबंधक हवेली-२ ला दि. ०५.०६.१९९० रोजी ने नोंद झाली त्या दस्ताची छायांकीत व साक्षांकित प्रत मिळण्याबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २५.१०.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांनी अर्जात मागणी केलेली माहिती कार्यालयाशी संबंधित नसल्याचे अपिलार्थी यांना कळविले आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २५.१०.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. ०४.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी मागणी केलीली माहिती १५ दिवसात देण्याव यावी, असा निर्णय परित केला आहे. तथापि अपिलार्थी यांना अद्यापही माहितीचे प्रदान झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग -२ हवेली क्र.१ यांचे कार्यालय, पुणे. यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी २५ पृष्ठांपर्यंतची माहिती / वस्तुनिष्ठ उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थीस २५ पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करून द्यावी.

2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे, जि. पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. २८१ / २०२५/ पुणे 2635/2026 दिनांक - 5/6/2026